नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 06/03/2021 (शनिवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावर मोरगाव शिवार येथे दिनांक 05/03/2021 चे 09.00 वा. ते 09.40 वा. दरम्यान अरोली पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन अरोली पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच– 35/एएस– 1675 क्रमांकाच्या पीकअप बोलेरो गाडीला थांबवुन तपासले असता त्यामध्ये आरोपी नामे– 1) दिपक राधेशाम कुंभलकर वय 26 वर्ष रा. माल्ही ता. तिरोडा जि. गोंदीया, 2) लोकेश सुखदास भगत वय 26 वर्ष रा. गुलाब टोला ता. तिरोडा जि. गोंदीया व 3) भास्कर गोविंद बिसेन (मालक) वय 32 वर्ष रा. बेरडीपार ता. तिरोडा जि. गोंदीया यांच्या ताब्यातुन एकुण 4 (म्हशी/हेले) कि. 1,40,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 13,40,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस निरीक्षक श्री. अशोक कोळी, ठाणेदार पो.स्टे. अरोली यांचे रिपोर्टवरून पो. स्टे. अरोली येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1) (5) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)(1)(2),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम तसेच कलम 109 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. संतोष महंत 9923416166 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी रामटेक विभाग श्रीमती नयण आलुरकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री अशोक कोळी, सहायक फौजदार श्री. संतोष महंत, पोहवा भगवान चांदेकर, नापोशी विशाल महालकर व अनिल चंदनबटवे यांनी केलेली आहे.



## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

पो. स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 किमी अंतरावर खापा ते सावनेर रोड अजन येथे दिनांक 05/03/2021 चे 12.41 वा. दरम्यान एमएच–27/एल–8109 क्रमांकाचा ट्रॅक्टर चालक आरोपी नामे– बादल संजय पालीवाल, वय 21 वर्ष, रा. दफई कोथुर्णा याने त्याच्या ताब्यातील वाहनात कन्हान नदीचे पात्रातुन खापा येथून विना परवाना अवैधरित्या एकुण 1 ब्रास रेती किं. 3,000/–रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन वाहनासह एकुण 3,03,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार अशोक आठवले पो.स्टे. सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री फुलेकर 7588564300 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत प्रभाग क्र. 2 बोरी येथे दिनांक 05/03/2021 चे 16:00 वा. पुर्वी गजानन पुजाराम फटिंग(मृतक) वय 30 वर्ष रा. प्रभाग क्र. 2 दुर्गा माता मंदिर जवळ बुटीबोरी हा मागील एक वर्षापासून लिव्हरचा आजाराने त्रस्त होता. त्याने आजाराला कंटाळुन त्याचे राहते घरी रूम मध्ये लहान मुलाचे पाळण्याचा नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– फकिरा मोतीरामजी फटींग, वय 60 वर्ष, रा.प्रभाग क्र. 2 दुर्गा माता मंदिर जवळ बुटीबोरी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अजय चौधरी 9765497005 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर